# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र. १५

सभावृत्तांत

दिनांक ०४/०३/२०१६ दुपारी १२.०० वा.

पिपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे मार्च २०१६ ची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०४/०३/२०१६ रोजी दुपारी १२.०० वा. ड क्षेत्रिय कार्यालयाच्या “छत्रपती शाहू महाराज सभागृह” येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. अरुण मदन टाक | सभापती |
| २. | मा. श्री. हिरानंद किंमतराम उर्फ डब्बू आसवाणी | सदस्य |
| ३. | मा. श्रीमती उषा संजोग वाघेरे (पाटील) | सदस्या |
| ४. | मा. श्रीमती विमल रमेश काळे | सदस्या |
| ५. | मा. श्रीमती निता विलास पाडाळे | सदस्या |
| ६. | मा. श्रीमती अनिता मच्छिंद्र तापकीर | सदस्या |
| ७. | मा. श्रीमती शितल विठ्ठल उर्फ नाना काटे | सदस्या |
| ८. | मा. श्री. कैलासभाऊ गबाजी थोपटे | सदस्या |
| ९. | मा. श्रीमती आरती सुरेश चोंधे | सदस्या |
| १०. | मा. श्री.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे | सदस्य |
| ११. | मा. श्री. रामदास गेणभाऊ बोकड | सदस्य |
| १२. | मा. श्रीमती वैशाली राहुल जवळकर | सदस्या |
| १३. | मा. राजेंद्र गणपत जगताप | सदस्य |

खालील प्रमाणे नामनिर्देशित सदस्य उपस्थित होते.

१. मा. श्री. शिवाजी तुकाराम पाडुळे

------------------

याशिवाय, मा. मा.मनोज लोणकर, प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा, मा. प्रमोद ओंभासे, कार्यकारी अभियंता, स्थापत्य, मा. संदेश चव्हाण कार्यकारी अभियंता विद्युत , मा. रामदास तांबे, कार्यकारी अभियंता,पाणीपुरवठा, मा. नितीन देशमुख, उपअभियंता, विद्युत, मा. एल.बी. जाधव, मा. विनय ओहोळ, उपअभियंता, स्थापत्य,मा. रवींद्र पवार, उपअभियंता, जलनि:सारण, मा. भाऊसाहेब साबळे, उपअभियंता, पाणीपुरवठा, मा. राजेंद्र इंगळे, उपअभियंता झोनिपू, मा. पोरेडी एस.डी, उपअभियंता, स्थापत्य, मा. अजय जाधव, मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. संकेत पावरा, कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, मा. रोकडे जयवंत, मा. वाकोडे ए.एम., मा. इदे ए.के. कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण, मा. व्हि. ए. पाडवी, कनिष्ठ अभियंता, विद्युत,मा. व्ही.पी. सोनवणे, कनिष्ठ अभियंता, स्थापत्य, मा. एस.के. माळी, आरोग्य निरीक्षक, पशू वैद्यकीय विभाग, मा. गेंगजे, क्रीडा निरीक्षक, मा. बैचे, हॉर्टीकल्चर सुपरवायझर, मा. जी. एन. खैरे, उद्यान निरीक्षक, इ. अधिकारी उपस्थित होते.

मा. सभापती : आज दिनांक ४/३/२०१६ रोजी माजी लोकसभा अध्यक्ष व राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सहसंस्थापक श्री. पी. ए. संगमा यांचे दु:खद निधन झाले असल्याने त्यांस श्रध्दांजली वाहून आजची प्रभाग समिती सभा १० मिनिटांसाठी तहकुब करणेत यावी अशी सूचना मांडतो.

मा. रामदास बोकड :- सदर सूचनेस मी अनुमोदन देतो.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

------------

(सर्व उपस्थितांनी दोन मिनिटे उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली,)

मा. सभापती :- आजची सभा दुपारी १२.४० वा. पर्यंत तहकुब करण्यात येत आहे.

------------

१० मिनिटांनंतर मा. सभापती यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात करण्याच्या सूचना दिल्या.

**मा. सचिव , सभा शाखा** :- मागील सभा कार्यपत्रिका क्र. १३, माहे जानेवारी २०१६ ची दिनांक ०५/०२/२०१६ व कार्यपत्रिका क्र. १४ माहे फेब्रुवारी २०१६ ची दिनांक ५/२/२०१६ रोजीचे सभांचे सभावृत्तांत कायम करणे

**मा. सभापती** :- मागील सभा कार्यपत्रिका क्र. १३ माहे जानेवारी २०१६ ची दिनांक ०५/०२/२०१६ व कार्यपत्रिका क्र. १४ माहे फेब्रुवारी २०१६ ची दिनांक ५/२/२०१६ रोजीचे सभांचे सभावृत्तांत कायम करणेस मान्यता देणेत येत आहे.

ड प्रभाग समिती कार्यपत्रिका क्र. १५ वरील विषयांवर खालीलप्रमाणे मंजुरी देणेत आली.

ठराव क्र. ३६ — विषय क्र. १

दिनांक ४/३/२०१६ — विभाग : स्थापत्य

सुचक: मा. निता विलास पाडाळे — अनुमोदक : मा. वैशाली राहुल जवळकर

संदर्भ : मा. निता विलास पाडाळे यांचा दिनांक ४/२/२०१६ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४७ काळेवाडी येथील कृष्णा रेसीडेन्सी समोरील चौकास “धर्मवीर संभाजी महाराज चौक” व शांता दुर्गा निवास कोकणेनगर येथील कॉलनीला “साई पार्क” असे नाम देणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------------

सन्मा. सदस्य व मा. सभापती यांचे मान्यतेने बैठकीमध्ये खालीलप्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.

**मा. सचिव, सभा शाखा** :- सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेस मान्यता मिळावी.

**विषय क्र. १ :** प्रभाग क्र. ५५ पिंपळे सौदागर येथील पोलीस चौकीमागील पूर्वा रेसिडेन्सी समोरील चौकाला “दामोदर काटे” नाव देणेबाबत

**विषय क्र. २** : प्रभाग क्र. ४५ मध्ये भिमनगर मधुन नव्याने तयार करण्यात आलेल्या भिमनगर ते शंभर फुटी रोडला जोडणा-या रस्त्याचे चौकास नामकरण करणे आहे. निलेश कांबळे यांचे घराशेजारील जागेच्या रस्त्यास “कालवंश श्री. डी.बी. कांबळे माजी सरपंच चौक” व सुभाष कांबळे यांचे घराशेजारील रस्त्यास “कालवंश श्री. विष्णु धोंडीबा कांबळे माजी उपसरपंच चौक” असे नाव देणे

**विषय क्र. ३** : प्रभाग क्र. ४४ मधील साई चौक सी ब्लॉक येथे मनपाचे संडास ब्लॉक आहे. सदरचे संडास ब्लॉक पाडून येथे नव्याने सुलभ पध्दतीने संडस ब्लॉक बांधणेत यावे अशी नागरीकांकडून मागणी येत आहे. सदर मागणीस अनुसरुन सी ब्लॉक येथील संडास ब्लॉक पाडून येथे नव्याने सुलभ पध्दतीने संडास ब्लॉक बांधणेबाबत

**विषय क्र. ४** : प्रभाग क्र. ४४ मधील साई चौक ते डेअरी फार्म या रस्त्यास “श्री. बसंतराम के. बजाज मार्ग” असे नामकरण करणेबाबत

**विषय क्र. ५** : महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २९अ(४) नुसार “पोट कलम (२) च्या उपखंड (अ) मध्ये निर्दशिलेले निवडून आलेले पालिका सदस्य, प्रभाग समितीच्या प्रत्येक सरकारी वर्षातील पहिल्या सभेमध्ये त्यांच्या स्वत:मधुन सभापती निवडुन देतील आणि आणि तो लगतनंतरच्या सरकारी वर्षातील पहिल्या सभेपर्यंत ते पद धारण करील” अशा तरतुदीनुसार सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामधील ड प्रभाग समितीची विशेष सभा माहे एप्रिल महिन्यात घेऊन पहिल्या सभेत सभापती निवड करणे आवश्यक असल्याने मा. विभागीय आयुक्त निश्चित करतील त्या दिवशी ड प्रभाग समितीची विशेष सभा आयोजीत करुन त्यामध्ये सभापतींची निवड करणेबाबतचा प्रस्ताव प्रभाग समितीसमोर घेणेबाबत

सन्मा. सदस्य व मा. सभापती यांचे मान्यतेने बैठकीमध्ये दाखल करुन घेणेत आलेल्या ऐनवेळच्या विषयांवर खालीलप्रमाणे मान्यता देणेत आली.

ठराव क्र. ३७ विषय क्र. २

दिनांक ४/३/२०१६ विभाग : स्थापत्य विभाग

सुचक : सौ.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे अनुमोदक : श्री. कैलासभाऊ थोपटे

संदर्भ : सन्मा. नगरसदस्या सौ.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे यांचेकडील दिनांक ४/३/२०१६ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ५५ पिंपळे सौदागर येथील पोलीस चौकीमागील पूर्वा रेसिडेन्सी समोरील चौकाला **"दामोदर काटे"** नाव देणेबाबत प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

---------------

ठराव क्र. ३८ विषय क. ३

दिनांक ४/३/२०१६ विभाग : स्थापत्य

सुचक : मा. श्रीमती उषा संजोग वाघेरे(पाटील) अनुमोदक : मा. श्रीमती निता विलास पाडाळे

संदर्भ : सन्मा. नगरसदस्या श्रीमती उषा संजोग वाघेरे(पाटील) यांचेकडील दिनांक ४/३/२०१६रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४५ मध्ये भिमनगर मधुन नव्याने तयार करण्यात आलेल्या भिमनगर ते शंभर फुटी रोडला जोडणा-या रस्त्याचे चौकास नामकरण करणे आहे. निलेश कांबळे यांचे घराशेजारील जागेच्या रस्त्यास "**कालवंश श्री. डी.बी. कांबळे माजी सरपंच चौक**" व सुभाष कांबळे यांचे घराशेजारील रस्त्यास "**कालवंश श्री. विष्णु धोंडीबा कांबळे माजी उपसरपंच चौक**" असे नाव देणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

-------------------

ठराव क्र. ३९ विषय क. ४

दिनांक ४/३/२०१६ विभाग : स्थापत्य

सुचक : मा.श्री.हिरानंद उर्फ डब्बु किमतराम आसवानी अनुमोदक : मा. श्रीमती निता विलास पाडाळे

संदर्भ : सन्मा. नगरसदस्य मा.श्री.हिरानंद उर्फ डब्बु किमतराम आसवानी यांचेकडील दिनांक ४/३/२०१६रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४४ मधील साई चौक सी ब्लॉक येथे मनपाचे संडास ब्लॉक आहे. सदरचे संडास ब्लॉक पाडून येथे नव्याने सुलभ पध्दतीने संडस ब्लॉक बांधणेत यावे अशी नागरीकांकडून मागणी येत आहे. सदर मागणीस अनुसरुन सी ब्लॉक येथील संडास ब्लॉक पाडून येथे नव्याने सुलभ पध्दतीने संडास ब्लॉक बांधणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

-------------------

ठराव क्र. ४० विषय क. ५

दिनांक ४/३/२०१६ विभाग : स्थापत्य

सुचक : मा.श्री.हिरानंद उर्फ डब्बु किमतराम आसवानी अनुमोदक : मा. श्रीमती निता विलास पाडाळे

संदर्भ : सन्मा. नगरसदस्य मा.श्री.हिरानंद उर्फ डब्बु किमतराम आसवानी यांचेकडील दिनांक ४/३/२०१६रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४४ मधील साई चौक ते डेअरी फार्म या रस्त्यास "श्री. बसंतराम के. बजाज मार्ग" असे नामकरण करणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

-------------------

ठराव क्र. ४१ विषय क. ६

दिनांक ४/३/२०१६ विभाग : प्रशासन

सुचक : मा.श्रीमती अनिता मच्छिंद्र तापकीर अनुमोदक : मा. आरती सुरेश चोंधे

संदर्भ : सन्मा. नगरसदस्य मा. श्रीमती अनिता मच्छिंद्र तापकीर यांचेकडील दिनांक ४/३/२०१६रोजीचा प्रस्ताव

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २९अ(४) नुसार "पोट कलम (२) च्या उपखंड (अ) मध्ये निर्दशिलेले निवडून आलेले पालिका सदस्य, प्रभाग समितीच्या प्रत्येक सरकारी वर्षातील पहिल्या सभेमध्ये त्यांच्या स्वत:मधुन सभापती निवडुन देतील आणि आणि तो लगतनंतरच्या सरकारी वर्षातील पहिल्या सभेपर्यंत ते पद धारण करील" अशा तरतुदीनुसार सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामधील ड प्रभाग समितीची विशेष सभा माहे एप्रिल महिन्यात घेऊन पहिल्या सभेत सभापती निवड करणे आवश्यक असल्याने मा. विभागीय आयुक्त निश्चित करतील त्या दिवशी ड प्रभाग समितीची विशेष सभा आयोजीत करुन त्यामध्ये सभापतींची निवड करणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

-------------------

मा. सभापती यांचे मान्यतेने सन्मा. सदस्यांनी सभेमध्ये खालीलप्रमाणे विविध विषयांवर त्यांचे मत व्यक्त केले.

**मा. राजेंद्र जगताप** :-ड प्रभाग समितीस बीआरटीस, वाहतुक, बांधकाम परवानगी, स्थापत्य उद्यान विभागाचे अधिकारी उपस्थित नसलेबाबत निदर्शनास आल्याने सदर विभागांचे विभागप्रमुखांना प्रभाग अधिकारी यांनी पत्र पाठवून तसे कळवावे. तसेच मे. बी.व्ही.जी. इंडिया कंपनी लि. यांचे भूमिगत केबलचे ड प्रभाग कार्यक्षेत्रातील कामकाजास अनुसरुन महाराष्ट्र महावितरण पारेषण कंपनीचे अधिकारी यांना बैठकीस उपस्थित राहण्याबाबत सूचना दिल्या होत्या.

**मा. सचिव तथा प्रशासन अधिकारी** :- मे. बी.व्ही.जी. इंडिया कंपनी लि. व महाराष्ट्र महावितरण पारेषण कंपनीचे अधिकारी बैठकीस उपस्थित राहिले आहेत.

मे. बी.व्ही.जी. इंडिया कंपनी लि.व महाराष्ट्र महावितरण पारेषण कंपनीयांचे भूमिगत केबलचे ड प्रभाग कार्यक्षेत्रातील कामकाजास अनुसरुन खालील प्रमाणे सन्मा. नगरसदस्य यांनी त्यांचे मत प्रदशिर्त केले.

**मा. आरती चोंधे** : कस्पटेवस्ती येथील मे. बी.व्ही.जी. कंपनी यांचे बॉक्सेस अद्याप हलविण्यात आलेले नाहीत.

**मा. निता पाडाळे** :- भूमिगत केबलचे कामकाज करताना ओव्हरहेड केबल काढण्यात आलेल्या नाहीत. श्रीकृष्ण कॉलनी येथील मिनी ट्रान्सफॉर्मरच्या वायर्स बदललेल्या नाहीत. मे. बी.व्ही.जी. यांचे कामकाज समाधानकारक नाही.

मा. अनिता तापकीर :- स्वामी समर्थ कॉलनीतील भूमिगत केबलचे काम थांबले आहे.

मा. राजेंद्र जगताप :- मे. बी.व्ही.जी. इंडिया यांचे ड प्रभाग परिसरातील भूमिगत केबलचे कामाची पध्दत काय ? या कामासाठी महावितरण कडून किती रकमेची कामे त्यांना देणेत आली आहेत व आतापर्यंत किती कामे पूर्ण करण्यात आली आहेत याबाबतची माहिती देणेत यावी. सदर विषयास अनुसरुन सन्मा. सदस्य सर्वश्री. डब्बु आसवानी, रामदास बोकड, कैलासभाऊ थोपटे, शिवाजी पाडुळे यांनी त्यांचे मत प्रदर्शित केले. तसेच स्थापत्य विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. ओंभासे, उपअभियंता श्री. पोरेडी यांनीही त्यांचे मत प्रदर्शित केले.

महावितरणचे कार्यकारी अभियंता श्री. औंढेकर यांनी माहिती देताना महावितरणकडून पिंपरी झोनसाठी ९० कोटीची भूमिगत केबलची कामे प्रस्तावित केलेली आहेत, त्यापैकी केवळ ३० टक्के कामे पूर्ण झालेली आहेत. मे. बी.व्ही.जी. कंपनी लि. यांची कामाची मुदत जुन २०१४ ते जुन २०१६ अशी आहे. महावितरणकडून हया कामासाठी कोणतेही शुल्क भरण्यात येत नाही तर मे. बी.व्ही.जी. ते शुल्क

महापालिकेकडे भरते व त्यांनतर महावितरणकडे सदर पावती सादर करुन त्याप्रमाणे त्यांना महावितरणकडून पैसे अदा केले जातात. महापालिकेस भरावयाच्या पैशाबाबत मंत्रालय येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते त्याचा सभावृत्तांत अद्याप प्राप्त झालेला नाही. मे. बीव्हीजी च्या कामासाठी आमचे अधिका-यांना कोऑर्डीनेटर म्हणुन नेमणेत आले आहे. त्यांचे कामासाठी एक स्वतंत्र अधिकारी नेमलेला आहे. संबंधितांची माहिती आपणांस कळविण्यात येईल.

**मा. राजेंद्र जगताप** : सदर विषयास अनुसरुन ड प्रभाग समितीचे सर्व सदस्य व महावितरणचे अधिकारी यांचेसह मा. आयुक्त सो. यांचेशी समक्ष चर्चा करणेत येईल.

**पाणीपुरवठा विभाग**:-

**मा. वैशाली राहुल जवळकर** : - वैदुवस्ती, सुदर्शननगर या परिसरात पाण्याला दाब कमी आहे. उद्यानाच्या टाकीचे काम बंद आहे. दुस-या जागेबाबत काहीही नियोजन करण्यात आले नाही.

**मा. बापू उर्फ शत्रुघ्न सीताराम काटे** :- पिंपळे सौदागर येथील पाण्याच्या टाकीचे काम अद्याप सुरु करण्यात आलेले नाही. जुनी टाकी काढण्याबाबत काहीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**मा. राजेंद्र जगताप** :- पिंपळे गुरव येथील पाण्याचे टाकीचे काम बंद आहे. ठेकेदार निश्चित करणेत यावा.

**मा. रामदास तांबे** :- पाणीपुरवठयाचे योग्य नियोजन करण्यात येईल तसेच प्रलंबित कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल.

**आरोग्य विभाग :-**

**मा. वैशाली राहुल जवळकर** : - कचरावाले येत नाही. गजरानगर व नेताजीनगर येथे कचरा गाडी नियमितपणे येत नाही. मा. रामदास बोकड यांनी यास दुजोरा दिला.

**मा. सभापती** :- सर्व उपस्थित अधिकारी यांनी सन्मा. नगरसदस्य यांनी दिलेल्या सूचनांनवर आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत सूचना देऊन सर्व सन्मा. नगरसदस्य व अधिकारी वर्ग यांचे आभार मानुन माहे मार्च २०१६ ची बैठक संपलेचे जाहीर करतो.

सही/-
( अरुण मदन टाक )
**सभापती**
ड प्रभाग समिती पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी ४११०१७

सही/-
**प्रशासन अधिकारी तथा**
सचिव (सभाशाखा)
ड प्रभाग समिती

क्रमांक – ड/१३/कावि/२०३/२०१६
दिनांक – ११ /०३/२०१६